# २ मानसशास्त्राच्या शाखा

२.१ प्रस्तावना
२.२ मानसशास्त्राच्या शाखा
२.२.१ सैद्धांतिक शाखा
१. वैकासिक मानसशाास्त्र
२. बाल मानसशास्त्र
३. सामाजिक मानसशास्त्र
४. बोधात्मक मानसशास्त्र
५. प्रायोगिक मानसशास्त्र
६. अपसामान्य मानसशास्त्र
२.२.२ उपयोजित शाखा
१. शैक्षणिक मानसशास्त्र
२. चिकित्सालयीन मानसशास्त्र
३. समुपदेशन मानसशास्त्र
४. गुन्हेगारी मानसशास्त्र
५. क्रीडा मानसशास्त्र
६. औद्योगिक मानसशास्त्र
२.३ मानसशास्त्रातील संधी

**अध्ययन उद्दिष्ट्ये :**

या पाठाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना खालील मुद्दे समजून घेणे सोयीस्कर व्हावे हे आहे.

१. विद्यार्थ्याला मानसशास्त्राच्या सैद्धांतिक व उपयोजित शाखांमधील फरक समजून घेण्यास प्रवृत्त करणे.

२. विद्यार्थ्याने मानसशास्त्राच्या विविध उपशाखांची माहिती घेणे व त्याचा वास्तविक आयुष्यातील उपयोग जाणून घेणे.

## २.१ प्रस्तावना :

मानसशास्त्र हे आधुनिक काळातील एक महत्वाचे शास्त्र आहे. मानसशास्त्राची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

वर्तनातील समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी मानसशास्त्राची नितांत गरज आहे. त्यामुळे मानसशास्त्राच्या नवनवीन शाखा उदयास येत आहेत. उदा. खेळाडूंच्या मानसिक समस्या सोडवण्यासाठी क्रीडा मानसशास्त्र ह्या नवीन शाखेचा उदय झाला आहे.

इंटरनेटमुळे आर्थिक व्यवहार करणे आणि सामाजिक संवाद साधणे सोपे झाले आहे पण त्याच बरोबर इंटरनेट वर चालणाऱ्या फसवेगिरी आणि खोटेपणाचाही जन्म झाला. या सर्व बाबी समजून घेण्यासाठी आणि त्यांना हाताळण्यासाठी सायबर मानसशास्त्राचा उदय झाला.

आताच्या घडीला मानवी वर्तनाचा वेगवेगळ्या पैलूंनी अभ्यास करणाऱ्या मानसशास्त्राच्या ५० हून अधिक शाखा अस्तित्वात आहेत. आता मानसशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखा पाहू....

## २.२ मानसशास्त्राच्या शाखा

**मागील पाठात आपण मानसशास्त्राचा इतिहास समजून घेतला आणि त्याची ध्येये थोडक्यात जाणून घेतली. आता आपण मानसशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखा विस्ताराने जाणून घेऊ...**

**कृती १ :**

खालील कार्य १ व कार्य २ च्या जोड्या पहा. त्यामध्ये घडणाऱ्या गोष्टींमधून तुम्ही त्यांच्यातील फरक ओळखू शकता का? इतर जोड्यांमध्ये सुद्धा तुम्हाला तसेच साधर्म्य आढळते का ते पहा.

**कार्य १ :** विद्यार्थ्यांचे वर्गातील वर्तन कोणकोणत्या घटकांमुळे प्रभावित होते त्याची नोंद करा..

**कार्य २ :** वरील माहितीचा उपयोग करून तुमच्या वर्गात अधिक चांगले वातावरण निर्माण करा.

**कार्य १ :** यशस्वी विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये ओळखा. त्यांची नोंद करा.

**कार्य २ :** वरील माहितीच्या आधारे इतर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक तत्वे तयार करा.

**कार्य १ :** व्यक्तींच्या दुःखाच्या वेगवेगळ्या कारणांची नोंद करा.

**कार्य २ :** वरील माहितीच्या आधारे तुम्ही त्यांना कशी मदत करू शकाल ते सांगा.

वरील कार्यांवरून तुमच्या हे लक्षात आले असेल कि, कार्य १ मधील सर्व जोड्या ह्या वेगवेगळ्या बाबींशी संबंधित आहेत जसे : व्यक्ती व त्यांच्या वातावरणाची नवनवीन माहिती शोधणे, त्यांच्या व त्यांच्याशी संबंधित व्यक्तींशी असलेले त्यांचे नातेसंबंध समजून घेणे इत्यादी म्हणजेच दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर कार्य १ हे व्यक्तींच्या प्रतिक्रियांवर सैद्धांतिक भाष्य करतात तर कार्य २ मध्ये त्या माहितीचा वापर करून त्या व्यक्तींच्या परिस्थितीत काय बदल घडवून आणता येईल याचा विचार करतात. ही दोन्ही कार्ये म्हणजे मानसशास्त्राच्या २ प्रमुख क्षेत्रांची उदाहरणे आहेत.

- मानसशास्त्राच्या सैद्धांतिक शाखा
- मानसशास्त्राच्या उपयोजित शाखा

आधुनिक मानसशास्त्र मानवी स्वभावाच्या प्रत्येक बाजूवर भाष्य करते. मानसशास्त्राची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे त्यामुळे मानसशास्त्राच्या अनेक उपशाखा अस्तित्वात आल्या आहेत. आता आपण काही शाखा विस्ताराने पाहू...

### २.२.१ सैद्धांतिक मानसशास्त्र

मानसशास्त्र हे एक असे सैद्धांतिक विज्ञान आहे कि ज्यामध्ये वेगवेगळ्या शाखांचा समावेश होतो. मानसशास्त्राच्या सैद्धांतिक शाखांमध्ये काम करणारे मानसशास्त्रज्ञ यांचा कल मुख्यत्वे संशोधन करणे व वेगवेगळे सिद्धांत मांडणे, वेगवेगळी तत्त्वे शोधणे व मानवी वर्तनाचे वेगवेगळे नियम मांडणे हा असतो.

**कृती २ :**

खालील स्तंभ पहा. प्रत्येक स्तंभात एका मानसशास्त्रीय उपशाखेबद्दल भाष्य केले आहे. त्यातील माहिती वाचून तुम्हाला त्या उपशाखा ओळखता येतात का ते पहा.

तक्ता क्र. १ वरील माहितीवरून तुमच्या लक्षात येईल कि,

पहिल्या स्तंभातील प्रश्न व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यातील होणाऱ्या बदलांवर भाष्य करते. हे प्रश्न **वैकासिक मानसशास्त्र** ह्या शाखेचा भाग आहेत.

**तक्ता क्र. १ मानसशास्त्राच्या सैद्धांतिक शाखा**

| वैकासिक मानसशास्त्र | बाल मानसशास्त्र | सामाजिक मानसशास्त्र | बोधनात्मक मानसशास्त्र | प्रायोगिक मानसशास्त्र | अपसामान्य मानसशास्त्र |
|---|---|---|---|---|---|
| बाल्यावस्थेत असताना व्यक्तीमध्ये कोणकोणते बदल होतात? | लहान मुलांच्या चुकीच्या वागण्याची काय कारणे असू शकतात? | जमावाला हिंसक होण्यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरतात? | व्यक्तींच्या अवधान कक्षेवरती कोणकोणत्या घटकांचा परिणाम होतो? | मानवी वर्तनावर प्रयोग करणे आवश्यक आहे का? | काही व्यक्ती अपसामान्य का वागतात? |
| पौगंडावस्थेत असताना व्यक्तीमध्ये कोणकोणते बदल होतात? | पालकांपासून दुराव्याचा मुलांवर काय परिणाम होतो? | व्यक्ती केंव्हा नियमांचे पालन करतात व केंव्हा नियम मोडतात? | व्यक्ती का व कधी विसरतात? | प्रयोगाच्या माध्यमातून मानवी वर्तनामागील कारणे समजतील का? | नैराश्याची किंवा अवसादाची कारणे काय आहेत? |
| वृद्धपकाळात व्यक्तींच्या कधी कधी विक्षिप्त वागण्याची काय कारणे असू शकतील? | काही मुले अंगठा का चोखतात? | काही गुण काही समाजात जास्त तर काही समाजात कमी महत्त्वाचे असतात. असे का? | भाषेच्या वापराचा संकल्पना निर्मितीवर कसा परिणाम होतो? | प्रयोगाच्या माध्यमातून मिळणाऱ्या माहितीतून वर्तनातील सामान्य तत्त्वे समजतील का? | काही व्यक्ती दुसऱ्यांविषयी अतिसंशयी का असतात? काही व्यक्ति अतिशय लहरी का असतात? |

दुसऱ्या स्तंभातील प्रश्न बालके व त्यांच्या प्रतिक्रिया यावर भाष्य करतात. ते **बाल मानसशास्त्र** या शाखेचा भाग आहेत.

तिसऱ्या स्तंभातील प्रश्न हे जमावामुळे व्यक्तीच्या प्रतिक्रियांवर होणारे परीणाम यावर भाष्य करतात. ते **सामाजिक मानसशास्त्र** या शाखेचा भाग आहेत.

चौथ्या स्तंभातील प्रश्न हे विशिष्ट बोधनात्मक क्षमतांवर भाष्य करतात. ते **बोधनात्मक मानसशास्त्राचा** भाग आहेत.

पाचव्या स्तंभातील प्रश्न, मानवी वर्तनावरील प्रयोगावर भाष्य करतात का? तो प्रायोगिक मानस शास्त्राचा एक भाग आहे.

सहाव्या स्तंभातील प्रश्न हे अपसामान्य वर्तनावर भाष्य करतात. ते **अपसामान्य मानसशास्त्राचा** एक भाग आहेत.

हे समजून घ्या कि मानसशास्त्राच्या वेगवेगळ्या उपशाखा आहेत. परंतु आपण फक्त मुख्य सहा शाखा या पाठात पाहणार आहोत.

### (१) वैकासिक मानसशास्त्र

गर्भधारणा झाल्यापासून ते मृत्युपर्यंत व्यक्तीच्या वर्तनातील होणाऱ्या बदलांचा वैकासिक मानसशास्त्रात अभ्यास केला जातो. व्यक्ती त्यांच्या पूर्ण आयुष्याच्या कालावधीत का व कसे बदलत जातात याचा वैकासिक मानसशास्त्रात शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास केला जातो. व्यक्तीचे विचार, भावना व वर्तन संपूर्ण आयुष्याच्या कालावधीत कसे बदलतात याचे स्पष्टीकरण करणे हे या शाखेचे मुख्य ध्येय आहे. वैकासिक मानसशास्त्रात आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांचा खोलवर अभ्यास केला जातो. जसे बाल्यावस्था, पौगंडावस्था, प्रौढावस्था आणि वृद्धावस्था. ही शाखा शारीरिक विकास, बोधनात्मक विकास आणि सामाजिक विकास या तीन वेगवेगळ्या पैलूंवर भाष्य करते.

### (२) बाल मानसशास्त्र

बाल्यावस्थेत होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक बदलांचा अभ्यास ह्या शाखेत केला जातो. हे बदल बालक परावलंबी पासून स्वावलंबी होताना दिसून येतात. उदा. या शाखेत काम करणारे मानसशास्त्रज्ञ मुलांच्या अनेक समस्यांचा अभ्यास करतात जसे खोटे बोलणे, शाळा बुडवणे, चोरी करणे, नकळत अंथरूण ओले करणे इत्यादी. या समस्या सोडविण्यासाठी ते प्रमाणित मानसशास्त्रीय चाचण्यांचा वापर करतात. ते प्रभावी बाल संगोपन पद्धती, मुलांना प्रेरित करण्यासाठी बक्षिसाचे असलेले महत्त्व यावर विविध संशोधने करतात.



**२.१ बाल मानसशास्त्र हे बाल्यावस्थेच्या काळाचा आणि बाल्यावस्था ते पौगंडावस्थेतील त्यांच्या वर्तनातील बदलांचा अभ्यास करते.**

### (३) सामाजिक मानसशास्त्र


आपण आपल्या आयुष्याच्या बहुतांश काळ हा इतरांसोबत घालवतो. इतरांबरोबर आपण वेगवेगळ्या वेळी व वेगवेगळया वातावरणात संवाद साधतो. सामाजिक मानसशास्त्र आपला इतरांच्या वर्तनावर व इतरांचा आपल्या वर्तनावर कसा परिणाम होतो याचा अभ्यास करते. **मायर** च्या मते, आपल्या वर्तनावर इतरांचा होणारा प्रभाव याचा वैज्ञानिक अभ्यास म्हणजे सामाजिक मानसशास्त्र. सामाजिक मानसशास्त्र खालील घटकांचा अभ्यास करते : गटातील सहकार्य किंवा स्पर्धा, व्यक्तीच्या वृत्ती, पूर्वग्रह, मैत्रीभाव व नेतृत्व गुण इत्यादी.

सामाजिक मानसशास्त्र व्यक्तींचे सामाजिक वर्तन आणि त्याचे वेगवेगळे प्रकार ह्यावर भाष्य करते ( उदा. सहकार्य, पूर्वग्रह इत्यादी) सामाजिक घटकांचा आपल्या वर्तनावर होणारा परिणाम याचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

### (४) बोधनात्मक मानसशास्त्र

बोधनात्मक मानसशास्त्रात विचार करणे, तर्क करणे आणि निर्णय घेणे अशा उच्च मानसिक प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. या व्यतिरिक्त अवधान, संवेदन, भाषेचा विकास, स्मृती, समस्या सोडवणे इत्यादीचाही अभ्यास या शाखेत केला जातो. या शाखेतील काही संशोधनाचे विषय पुढीलप्रमाणे असतात : स्मृतीभ्रंश का होतो? कोणत्या वेगवेगळ्या अध्ययन शैली आहेत? कोणत्या शिक्षण अक्षमता आहेत? त्यांची कारणे कोणती? वाचा दोषांची कारणे कोणती? इत्यादी.

**बोधनात्मक मानसशास्त्र**




**२.२ मानसिक प्रक्रियांचा बोधात्मक मानसशास्त्रात अभ्यास**

### (५) प्रायोगिक मानसशास्त्र

प्रायोगिक मानसशास्त्रज्ञ हे वर्तनाची मुलभूत कारणे समजून घेण्याचा प्रयत्न करतात. व्यक्ती वेदक उद्दिपकांना कशा प्रतिक्रिया देतात व या जगाचे कसे आकलन करतात याबद्दल ते संशोधन करतात. व्यक्ती कशा शिकतात व स्मृतीत ठेवतात, कशा भावनिक तर्क व प्रतिक्रिया देतात याचा प्रायोगिक मानसशास्त्रज्ञ अभ्यास करतात. ही शाखा वेदन, संवेदन, अध्ययन व स्मृती यातील समस्या कशा हाताळाव्या याचा अभ्यास करतात. या सगळ्या समस्यांची उकल ही प्रयोगशाळेत मानवी वर्तनाचा अभ्यास करून करतात.



**२.३ इव्हान पॅवलॉव्हनी अभिजात अभिसंधानाचे प्रयोग कुत्र्यावर केले.**

### (६) अपसामान्य मानसशास्त्र

अपसामान्य मानसशास्त्र ही शाखा वेगळ्या प्रकारचे वर्तन, भावना व विचार यांचा अभ्यास करते. अपसामान्य वर्तनाची कारणे व त्यासाठी कारणीभूत ठरणारे घटक यांचा अभ्यास करणे हे या शाखेचे मुख्य ध्येय असते. उदा. अति संशयीपणा, अति लहरीपणा, अस्तित्वात नसणाऱ्या गोष्टी किंवा परिस्थिती यांचा भास होणे, मतिमंदत्व, एखाद्या गोष्टी, प्राणी किंवा परिस्थितीचे अपरिमित भय असणे इत्यादी.

**कृती ३ :**

वर नमूद केलेल्या प्रत्येक सैद्धांतिक उपशाखेत बसतील अशी एक एक उदाहरणे शोधा.


### २.२.२. उपयोजित मानसशास्त्र

सैद्धांतिक मानसशास्त्रामधील संशोधनातून निपजलेली तथ्य आणि तत्त्व यांचा आधार घेऊन प्रत्यक्ष आयुष्यातील समस्या सोडविण्यासाठी विविध तंत्रे विकसित केली जातात. उपयोजित मानसशास्त्राच्या विविध शाखांमार्फत मानसशास्त्रज्ञ त्यातील ज्ञानाचा वापर व्यक्तींच्या आयुष्यातील अडचणी सोडविण्यासाठी व त्यांना परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी करतात. उपयोजित मानसशास्त्राच्या काही शाखा पाहूया.

#### (१) शैक्षणिक मानसशास्त्र

शिक्षणाशी संबंधित घटकांचा अभ्यास शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो. 'शिकणे ते शिकवणे' या प्रक्रियेची गुणवत्ता वाढण्याचा यात प्रयत्न केला जातो. शिकण्याच्या व शिकवण्याच्या परिणामकारक पद्धती तयार करणे, विशेष मुलांसाठी वेगळ्या कार्यक्रमाची आखणी करणे इत्यादी कार्ये शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ करतात. शिकणे व शिकवणे या प्रक्रियेतील अडचणींचा ही ते अभ्यास करतात. गतीमंद, सामान्य व असमान्य अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना अभ्यासात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे हे या शाखेच्या केंद्रस्थानी आहे. मुलांना प्रेरित करण्यासाठी, परिणामकारक अभ्यासतंत्रे व सवयी विकसित करण्यासाठी, वर्गात अधिक चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ विविध कार्यक्रम तयार करतात.

शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ हे मुख्यत्वे शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांशी संलग्न असतात. प्रमाणित मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आधारे ते मुलांना मार्गदर्शन करतात. अध्ययन अक्षमता, अवधान न्यूनता अतिक्रिया विकृती यासारख्या मुलांमध्ये आढळून येणाऱ्या वर्तन समस्या ते हाताळतात.




**२.४ शैक्षणिक मानसशास्त्राची व्याप्ती**

**कृती ४ :**

खालील दिलेल्या क्षेत्रांमधील किमान एका समस्येचा विचार करा ज्यावर शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ उपाय सुचवू शकतात.

१. विद्यार्थ्याचे वर्तन
२. शिकवण्याची पद्धत
३. शिक्षकाची वर्गातील वागणूक

#### (२) चिकित्सा मानसशास्त्र

चिकित्सा मानसशास्त्र हे व्यक्तीच्या भावनिक वर्तनाविषयीच्या समस्यांचा अभ्यास, निदान व उपचारांशी संबंधित असते. जसे मानसिक आजार, वैवाहिक व पारीवारिक संघर्ष, मादक व्यसनासक्ती, अति नैराश्य, बाल गुन्हेगारी इत्यादींचे निदान करुन त्यावर उपाय योजण्यासाठी चिकित्सा मानसशास्त्राचा उपयोग होतो.

लाभार्थींची मुलाखत व त्यांच्या नातलगांकडून मिळालेली सखोल माहिती यांचा वापर करुन ते लाभार्थींना मदत करतात. लाभार्थींच्या समस्या सोडविण्यासाठी ते योग्य त्या मानसोपचारांचा वापर करतात.

चिकित्सा मानसशास्त्रज्ञ इस्पितळात व समुदाय आरोग्य केंद्रात काम करतात किंवा स्वतंत्रपणेही काम करतात. ही मानसशास्त्राची सर्वात मोठी उपशाखा आहे.



**२.५ चिकित्सा मानसशास्त्र**

**कृती ५ :**

'डिअर जिंदगी' सारखा एखादा चित्रपट पाहा व त्यातील चिकित्सा मानसशास्त्रज्ञ त्या चित्रपटातील स्त्री पात्राला कशी मदत करतात याची नोंद करा.

### (३) समुपदेशन मानसशास्त्र

मानसशास्त्राचे हे क्षेत्र चिकित्सा मानसशास्त्राशी मिळते जुळते आहे परंतु समुपदेशक हे वर्तनातील सौम्य समस्यांचा अभ्यास करतात. व्यक्तीला सामना करावा लागणाऱ्या समायोजनातील अडचणींबाबत ते मार्गदर्शन करतात. समुपदेशक हे व्यवसाय मार्गदर्शन सुद्धा करतात. एखाद्या व्यक्तीला अभ्यासात, स्वतःच्या आयुष्यात किंवा कामाच्या ठिकाणी सामना कराव्या लागणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी समुपदेशक मदत करतात.

**कृती ६ :**

खालील क्षेत्रांमधील कुठल्याही एका अडचणीचा विचार करा जी सोडवायला समुपदेशक मदत करू शकतात.

१. आपल्या वयोगटातील मुलांशी जुळवून घेणे

२. पालक व भावंडांशी जुळवून घेणे

३. आपल्या व्यवसाय निवडीबद्दल निर्णय घेणे

### (४) गुन्हेगारी मानसशास्त्र

मानसशास्त्राची ही शाखा सामाजिक मानसशास्त्राच्या सर्वात जवळची शाखा आहे कारण गुन्हे हे समाजातच घडतात. घडलेल्या गुन्ह्यांची कारणे शोधणे, गुन्हेगारांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे, गुन्हेगारी प्रवृत्तीला काबूत ठेवण्यासाठी योजना आखणे आणि गुन्हेगारांच्या सुधारणेसाठी योजना तयार करणे हे गुन्हेगारी मानसशास्त्रज्ञांचे काम आहे. गुन्हेगारी वर्तनामागील उद्दिष्ट्यांचा अभ्यास गुन्हेगारी मानसशास्त्रात केला जातो. हे मानसशास्त्रज्ञ कायदा अंमलबजावणी विभागात किंवा गुन्हे अन्वेषण विभागात किंवा गुन्हेगारांच्या सुधारणेसाठी कार्यरत असणाऱ्या सामाजिक संस्थांमध्ये काम करतात. न्यायवैद्यक विभागात गुन्ह्याची व गुन्हेगाराची पार्श्वभूमी समजून घेणे आणि त्याचा छडा लावणे यात हे मानसशास्त्रज्ञ महत्त्वाची भूमिका बजावतात.

**कृती ७ :**

गुन्हेगारांचे वर्तन जाणून घेण्यासाठी गुन्हेगारी संबंधित कोणतीही एक मालिका पहा व त्यासंबंधित अहवाल तयार करा.

### (५) क्रीडा मानसशास्त्र

क्रीडा मानसशास्त्रज्ञ खेळाडूंना मैदानावर असताना तसेच नसताना सुद्धा त्यांची प्रेरणा, सहनशक्ती यात सातत्य ठेवण्यात तसेच ती वाढवण्यात मदत करतात. तणावपूर्ण परिस्थितीमध्ये सुद्धा संयमित राहण्यासाठी, वाईट काळातून जात असतानाही भावनिक समतोल राखण्यासाठी तसेच दुखापतीतून बरे होत असताना क्रीडा मानसशास्त्रज्ञ खेळाडूंना मदत करतात.


**कृती ८ :**

खालील क्षेत्रांमधील कुठल्याही एका समस्येचा विचार करा ज्यावर क्रीडा मानसशास्त्रज्ञ तोडगा सुचवू शकतात.

१. संघभावनेत सुधारणा करणे.

२. भावनांचे नियोजन.

३. आत्मविश्वास वाढवणे.




**२.६ क्रीडा मानसशास्त्र – उद्दीष्ट्ये**

### (६) औद्योगिक मानसशास्त्र

औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या वर्तनाचा ह्या शाखेत अभ्यास केला जातो. औद्योगिक मानसशास्त्रज्ञ कर्मचाऱ्यांची निवड व त्यांना कार्यभार देणे, त्यांना प्रेरित करणे, त्यांच्या कार्याचे समाधान वाढवणे, मूल्यमापन करणे व त्यांच्या तक्रारींचे निवारण करणे यात महत्वाची भूमिका बजावतात. कर्मचाऱ्यांना त्यांचे समूह मनोबल वाढवणे तसेच नेतृत्व गुण वाढवणे यासाठी सुद्धा हे मानसशास्त्रज्ञ मदत करतात.

ग्राहकांचे मानसशास्त्र ही औद्योगिक मानसशास्त्राची एक शाखा आहे जी ग्राहकांचे वर्तन, उत्पादनाचा दर्जा, उत्पादनाची विश्वसनीयता व केली जाणारी जाहिरात इत्यादी घटकांचा खरेदीवर कसा परिणाम होतो त्याचा अभ्यास करते.

**कृती ९ :**

१. तुमच्या पालकांशी / शिक्षकांशी बोलून त्यांना कार्याचे समाधान कोणत्या घटकांमुळे मिळते याची नोंद करा.

२. बाजारातून काहीही खरेदी करताना कोणते घटक तुमच्या निवडीवर प्रभाव पाडतात याची नोंद करा. उदा. जाहिरात, ब्रँड

मानसशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखांच्या अभ्यासावरून, तुम्हाला वेगवेगळ्या क्षेत्रांची ओळख व त्यातील संधींची ओळख झाली असेल. त्यानुसार तुम्हाला तुमच्या उच्च शिक्षणासाठी कोणती शाखा निवडता येईल याची थोडी फार कल्पना आली असेल. या पुढील पाठात मानसशास्त्राचा वापर आपण आपले आयुष्य अधिक चांगले बनवण्यासाठी कसे करू शकतो ते पाहूया...

## २.३ मानसशास्त्रातील संधी

**तक्ता क्र. २ मानसशास्त्रातील संधी**

| मानसशास्त्रातील क्षेत्रे | संधी | वर्णन |
|---|---|---|
| १. समुपदेशन मानसशास्त्र | १. शैक्षणिक समुपदेशक<br>२. व्यावसायिक समुपदेशक<br>३. वैवाहिक समुपदेशक | मानवी जीवनातील विविध समस्या सोडविण्यास मदत करणे. |
| २. शैक्षणिक मानसशास्त्र | १. शालेय समुपदेशक<br>२. शैक्षणिक समुपदेशक | शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध समस्या सोडविणे. |
| ३. चिकित्सा मानसशास्त्र | १. समुपदेशक मानसशास्त्रज्ञ<br>२. मनोविश्लेषक<br>३. मानसोपचारतज्ञ<br>४. मनोचिकित्सा परीचारिका<br>५. पुनर्वसन मानसशास्त्रज्ञ<br>६. संमोहन उपचारतज्ञ | शाळा, दवाखाना, खाजगी व सामाजिक क्षेत्रामध्ये वापर |
| ४. औद्योगिक व संघटनात्मक मानसशास्त्र | १. औद्योगिक व संघटन मानसशास्त्रज्ञ<br>२. उपभोक्ता मानसशास्त्रज्ञ<br>३. औद्योगिक मानसशास्त्रज्ञ (मानवास उपयुक्त साधने बनविणे.) | कर्मचाऱ्यांची निवड व मूल्यमापनात मदत |
| ५. सामाजिक मानसशास्त्र | १. जनसंपर्क अधिकारी<br>२. समाज कल्याण अधिकारी<br>३. कामगार कल्याण अधिकारी | सामाजिक क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यास मदत. सामाजिक सेवा संस्था (NGO) मध्ये कार्य |
| ६. क्रीडा मानसशास्त्र | १. क्रीडा मानसशास्त्रज्ञ<br>२. समुपदेशक | विविध खेळांमध्ये खेळाडूंचे मनोबल वाढवण्यास मदत करते. |

| मानसशास्त्रातील क्षेत्रे | संधी | वर्णन |
|---|---|---|
| ७. पुनर्वसन मानसशास्त्र | १. विशेष शिक्षक<br>२. पुनर्वसन मानसशास्त्रज्ञ<br>३. आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन अधिकारी | दिव्यांग / विशेष मुलांसाठी मदत, सुधारगृह व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये कार्य |
| ८. बाल मानसशास्त्र | १. बाल मानसशास्त्रज्ञ<br>२. महिला बाल कल्याण अधिकारी<br>३. गृह अधीक्षक | बालकांच्या मानसिक समस्यांचा अभ्यास |
| ९. सैनिकी मानसशास्त्र | १. लष्कराचे मानसिक आरोग्य सांभाळणारा अधिकारी<br>२. लष्करी मानसशास्त्रज्ञ<br>३. नौसेना मानसशास्त्रज्ञ<br>४. वायुसेना मानसशास्त्रज्ञ<br>५. समुद्री मानसशास्त्रज्ञ | सैनिकांची निवड, संरक्षण खात्यात काम करणाऱ्या व्यक्तींचे मनोबल टिकवून ठेवणे व त्यांचे पुनर्वसन करणे. |

**सारांश :**

- मानसशास्त्रज्ञ वेगवेगळ्या वर्तन समस्या समजून घेण्याचा व त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आता मानसशास्त्राच्या विविध शाखा उदयास येत आहेत. उदा. इंटरनेट वापराशी संबंधित असणाऱ्या वर्तन समस्या सोडविण्याकरिता **सायबर मानसशास्त्र** ही शाखा उदयास आली आहे.
- सैद्धांतिक शाखेमध्ये वैकासिक मानसशास्त्र मानवाच्या विविध विकास अवस्थांचा अभ्यास करते. बाल मानसशास्त्रात बाल्यावस्थेत घडून येणारे विविध बदल आणि त्यांच्या वर्तनाविषयीचा अभ्यास होतो. सामाजिक मानसशास्त्रात व्यक्ती वर्तनावर समाजाचा पडणारा प्रभाव व समाज वर्तनावर व्यक्तीचा पडणारा प्रभाव याचा अभ्यास करते. अपसामान्य मानसशास्त्र अपसामान्य वर्तनाचे विविध आकृतीबंध कारणे व उपाय यांचा अभ्यास करते. प्रायोगिक मानसशास्त्र वर्तनाच्या मूलभूत कारणांचा अभ्यास करते.
- उपयोजित मानसशास्त्र दररोज येणाऱ्या वर्तन समस्यांचा अभ्यास करते. उपयोजित मानसशास्त्रज्ञ मानवाला दररोजच्या आयुष्यात चांगल्या रितीने समायोजन कसे करता येईल या विषयी मार्गदर्शन करते. उदा. चिकित्सालयीन मानसशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र, क्रिडा मानसशास्त्र, गुन्हेगारांचे मानसशास्त्र या सर्वांचा मानवी आयुष्याचे कल्याण करण्यात मोठा सहभाग आहे.

**महत्त्वाच्या संज्ञा :**

- सैद्धांतिक मानसशास्त्र
- वैकासिक मानसशास्त्र
- बाल मानसशास्त्र
- सामाजिक मानसशास्त्र
- बोधनात्मक मानसशास्त्र
- प्रायोगिक मानसशास्त्र
- अपसामान्य मानसशास्त्र
- शैक्षणिक मानसशास्त्र
- समुपदेशन मानसशास्त्र
- क्रीडा मानसशास्त्र
- गुन्हेगारी मानसशास्त्र
- औद्योगिक मानसशास्त्र

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील वाक्ये पूर्ण करा.**

१) मानसशास्त्राची शाखा जी विविध परिवर्तके आणि मानवी वर्तनामधील संबंध शोधण्यास निगडीत आहेत तिला .................... मानसशास्त्र म्हणतात.

अ) सैद्धांतिक ब) उपयोजित
क) प्रायोगिक

२) कामाच्या ठिकाणी घडणाऱ्या वर्तनाचा अभ्यास हा .................... मानसशास्त्राचा भाग आहे.

अ) सामाजिक ब) औद्योगिक
क) प्रायोगिक

३) पौगंडावस्थेच्या समस्या .................... मानसशास्त्राचा भाग आहे.

अ) वैकासिक ब) सामाजिक
क) बोधनात्मक

४) .................... मानसशास्त्रात मानसिक आजारांचे निदान व चिकित्सा ह्यांचा अभ्यास होतो.

अ) समुपदेशन ब) बोधनात्मक
क) चिकित्सा

**(ब) वेगळा घटक ओळखा.**

१. प्रायोगिक मानसशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, बोधनात्मक मानसशास्त्र

२. चिकित्सालयीन मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, क्रिडा मानसशास्त्र, अपसामान्य मानसशास्त्र

**(क) जोड्या लावा.**

| अ | ब |
|---|---|
| १) वैकासिक मानसशास्त्र | अ) संस्था, कर्मचारी प्रशिक्षण, मानवी संसाधनाचा अभ्यास |
| २) गुन्हेगाराची मानसशास्त्र | ब) गर्भापासून मृत्यूपर्यंतच्या व्यक्तिविकासाचा अभ्यास |
| ३) शैक्षणिक मानसशास्त्र | क) विचारप्रक्रियांचा अभ्यास |
| ४) औद्योगिक मानसशास्त्र | ड) अध्ययनाच्या परिणामकारक पद्धतीचे उपयोजन |
| ५) सामाजिक मानसशास्त्र | इ) गुन्हेगाराच्या वर्तनाचा अभ्यास |
| ६) बोधनात्मक मानसशास्त्र | फ) मानवी वर्तनावर समूहातील इतर सदस्यांचा प्रभाव |

**प्र. २. साम्य व तफ़ावत सांगा.**

१. सैद्‌धांतिक मानसशास्त्र आणि उपयोजित मानसशास्त्र

२. चिकित्सा मानसशास्त्र आणि अपसामान्य मानसशास्त्र

**प्र. ३. टिपा लिहा**

१. चिकित्सा मानसशास्त्र

२. बोधनात्मक मानसशास्त्र

३. वैकासिक मानसशास्त्र

४. औद्‌योगिक मानसशास्त्र

**प्र. ४. खालील परिस्थितीत मानसशास्त्राची कोणती शाखा मदत करू शकते?**

१. गैरसमजुतीमुळे नवरा-बायकोत सतत भांडण.

२. मित्राच्या वडिलांची नैराश्यामुळे नोकरी जाते.

३. पाचवीच्या मुलाला एकाग्रतेने अभ्यास करता येत नाही.

४. मला विचारप्रक्रियेचा अभ्यास करायचा आहे.

५. मला समूहातील अभिवृत्ती, पूर्वग्रह आणि संघर्ष ह्याचा अभ्यास करायचा आहे.

**प्र. ५. खालील दिलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानसशास्त्राच्या कोणत्याही पाच सैद्‌धांतिक शाखा स्पष्ट करा.

२. मानसशास्त्राच्या कोणत्याही पाच उपयोजित शाखा स्पष्ट करा.

३. मानसशास्त्रातील कोणत्याही पाच व्यवसायाच्या संधी सविस्तर लिहा.